20

दिनांक :- ०३/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक - श्री. संजय महादेव पवार, वय 46 वर्षे, व्यवसाय - नौकरी, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय भोकरदन ता.भोकरदन जि.जालना यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रक्कम 15,000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे भोकरदन, जिल्हा जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. संजय महादेव पवार, वय 46 वर्षे, व्यवसाय - नौकरी, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय भोकरदन ता.भोकरदन जि.जालना रा. जे.पी.नगर, भोकरदन जि. जालना. |
| लाच मागणी रक्कम | :- | 30,000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 15,000/- रुपये. (तडजोडीअंती)/- |
| तपास अधिकारी | :- | हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | यातील तक्रारदार यांचे माहोरा ता.भोकरदन येथील परमीट रुम हॉटेलचे नुतणीकरण करुन दिल्याचा मोबदला म्हणून. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे माहोरा ता.भोकरदन येथील परमीट रुम हॉटेलचे नुतणीकरण करुन दिल्याचा मोबदला म्हणून आ.लो.से. श्री. संजय पवार यांनी 30,000/- रुपये लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. संजय पवार यांनी 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 03/05/2023 रोजी राज्य उत्पादन शिल्क कार्यालय भोकरदन येथे सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. संजय पवार यांनी पंचासमक्ष राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात भोकरदन येथे तडजोडीअंती रुपये 15000/- तक्रारदार यांचेकडून स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे भोकरदन जिल्हा जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो.अं./ साईनाथ तोडकर, राजेंद्र सिनकर, सुनील पाटील, दत्ता होरकटे, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

3/5/23

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.